दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १६१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.४ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांची दुहेरी मालमत्ता कराच्या जाचातून होणार सुटका

## सिडको नागरी सुविधा पुढील दोन महिन्यात हस्तांतरीत करण्याचे नगरविकासमंत्र्यांचे निर्देश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना दुहेरी मालमत्ता कराच्या जाचातून सोडवण्यासाठी सिडको प्राधिकरणाकडून पुरवल्या जाणाऱ्या नागरी सेवा पुढील दोन महिन्यात पनवेल महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याचे निर्देश नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यानंतर फक्त महापालिकेला कर आकारणीचे अधिकार मिळणार असल्याने दुहेरी कराचा मुद्दा कायमस्वरूपी निकाली निघेल, असेही श्री. शिंदे यांनी स्पष्ट केले. सध्या आकारण्यात आलेल्या दुहेरी मालमत्ता कराचा प्रश्न सकारात्मकरित्या सोडवण्याची तयारीही त्यांनी यावेळी दर्शवली.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीला रायगडच्या पालकमंत्री कु.अदिती तटकरे, आमदार बळीराम पाटील, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी आणि महेश पाठक, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, श्री. बबन पाटील आणि पनवेलमधील रहिवासी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका २०१६ मध्ये अस्तित्वात आली. मात्र पहिली काही वर्षे पालिकेने नागरिकांकडून मालमत्ता कर घेतलेला नव्हता. मात्र यावर्षी नागरिकांना मालमत्ता कर देण्यासाठी नोटीसा पाठवण्यात आल्या. मात्र या नोटिसा पूर्वलक्षी प्रभावाने पाठवल्यामुळे नागरिकांनी याबाबत नाराजी दर्शवली होती. पनवेल महानगरपालिका अतित्वात आल्यानंतरही अनेक नागरी सेवा या सिडको प्राधिकरणाकडून पुरवण्यात येत असल्याने आणि त्यासाठी लागणारा सर्व्हिस चार्ज सिडको प्राधिकरण आकारत असल्याने नागरिकांवर दुहेरी मालमत्ता कराचा बोजा पडत होता. जोपर्यंत सिडकोकडून पालिकेकडे सर्व सेवांचे हस्तांतरण होत नाही तोपर्यंत दुहेरी कराची ही तलवार कायम राहणार असल्याने या सर्व नागरी सेवांचे हस्तांतरण पुढील दोन महिन्यात करण्याचे निर्देश श्री. शिंदे यांनी सिडको प्राधिकरण आणि पनवेल महानगरपालिका आयुक्तांना दिले.



> पनवेल महानगरपालिकेकडे सर्व नागरी सुविधा हस्तांतरित झाल्यानंतर त्यांची डागडुजी करण्यासाठी वर्षाला २१६ कोटींची गरज असल्याचे पनवेल महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले. त्यामुळे निधी उभारण्यासाठी मालमत्ता कराची आकारणी करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र सद्यस्थितीत कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांना हा कर भरणे शक्य नसल्याने या करातून सवलत देण्याची मागणी रहिवाशांनी केला. लोकांना याबाबत दिलासा देण्यासाठी पूर्वलक्षी प्रभावाने आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कराबाबत नागरिकांना नक्की दिलासा कसा देता येईल याबाबत कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेऊ.
>
> **एकनाथ शिंदे, नगरविकासमंत्री**

# उरण परिसरात शासकीय अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताने अवैध बांधकामांना ऊत

## भांडवलदार, विकासकाकडून सीआरझेड, शासकीय नियमांचे खुलेआम उल्लंघन !



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील ग्रामीण भागात सीआरझेड, वन, महसुली आणि खासगी क्षेत्रात शासकीय नियमांना धाब्यावर बसवून तथाकथित भांडवलदार, विकासकांची मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामे सुरू आहेत. अवैधरित्या सुरू असलेल्या शेकडो ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामांना संबंधित शासकीय अधिकाऱ्यांचाच वरदहस्त असल्याने अवैध बांधकामांचा वारु बेफामपणे उधळतच चालला आहे.

अनेक ठिकाणी खासगी येथील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी केल्या आहेत. अशा शेतकऱ्यांकडून कायदेशीर, बेकायदेशीरपणे खरेदी करण्यात आलेल्या शेकडो हेक्टर जमिनींवर प्लाट, बंगले, इमारती, रो हाऊसेस उभारण्यात येत आहेत. ग्राहकांना अगदी स्वस्तात देण्यात येणार असुन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या जाहिराती केल्या जात आहेत. यासाठी खासगी जागांबरोबर उरण तालुक्यातील ग्रामीण भागा-तील सीआरझेड, वन, महसुली आणि खासगी क्षेत्रात शासकीय नियमांना धाब्यावर बसवून भांडवलदार, विकासकांची मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत.

अशा या दलालांवर फक्त शासकीय यंत्रणेला खुष करण्याची आणि स्थानिक अडथळे दूर करण्याची कामे सोपविण्यात आली आहेत. यामध्ये विकासक, भांडवलदारांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अनेक प्रकरणे पोलिस, तहसिलदार यांच्याकडे दाखल करण्यात आलेली आहेत. शासकीय यंत्रणाही अशा विकासक, भांडवलदारांच्या

.../२

> उरण तालुक्यातील अनेक ठिकाणी सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांना आळा घालण्यासाठी आणि अतिक्रमण रोखण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच फसव्या जाहिरातींना बळी न पडता ग्राहकांनीही जागा, जमीन, प्लांट खरेदी करताना डोळसपणे चौकशी करावी. खातरजमा, खात्री पटल्यानंतरच जमींनींचे व्यवहार करावेत. तसेच उरण परिसरात होत असलेल्या बेकायदेशीर बांधकामांवर लवकरच कारवाई करण्यात येईल.
>
> **भाऊसाहेब अंधारे, तहसिलदार - उरण**

> शेतकरी, नागरिक, ग्राहकांनी शेतजमीन खरेदी-विक्री करताना फसवणूक होणार नाही याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. परिसरातील शेतकऱ्यांची भांडवलदारांकडून होणाऱ्या फसवणूकीच्या काही तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या आहेत. तक्रारी नंतर काही विकासकांवर गुन्हेही दाखल करण्यात आले आहे.
>
> **रविंद्र बुधवंत**
> **वरिष्ठ पोलिस निरीक्षक,**
> **उरण पोलिस ठाणे**

### संक्षिप्त...

# ४,३९३ नवीन कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज ४,३१३ नवीन कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ४ हजार ३६० रुग्ण कोरोनामुक्त झाले आहे. राज्यात आतापर्यंत ६२ लाख ८६ हजार ३४५ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७. ०४ टक्के आहे. राज्यात आज ९२ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्याचा मृत्यूदर २.१२ टक्के झाला आहे. राज्यात सध्या ५० हजार ४६६ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. पुणे जिल्ह्यात सध्या सर्वात जास्त १४, ९७३ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. राज्यातील एकूण १७ जिल्ह्यात ॲक्टिव्ह रुग्णसंख्या १०० च्या खाली आहे. जळगाव (६६), नंदूरबार (२), धुळे (२५), जालना (२२), परभणी (५३), हिंगोली (६०), नांदेड (२८), अकोला (१८), वाशिम (१), बुलढाणा (७४), यवतमाळ (१३), नागपूर (६४), वर्धा (३), भंडारा (६), गोंदिया (३), गडचिरोली (३७) या १७ जिल्ह्यात ॲक्टिव्ह रुग्णसंख्या १०० च्या खाली आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ५, ४४,८७,९५० प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ६४,७७,९८७ (११.९८ टक्के) नमुने पॉझिटिव्ह आले आहेत.

# गणेशोत्सवाकरिता पनवेल महानगरपालिकेच्यावतीने तयारी सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेची तयारी सुरू झाली आहे. विसर्जनासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चार प्रभागातील ६३ ठिकाणी सोय करण्यात आली आहे. यामध्ये विसर्जन घाट, तलाव यांच्या स्वच्छतेचे काम अंतिम टप्यानेत आले आहे. सहाय्यक आयुक्त श्री. धैर्यशील जाधव यांनी नुकतीच या ठिकांणाची पहाणी करून कामाचा आढावा घेतला.

येत्या दहा तारखेला गणोत्सवाला सुरूवात होणार असून दिड दिवस,पाच दिवस, सात दिवस, दहा दिवसाच्या बाप्पांच्या विसर्जनानुसार महापालिकेडून व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच मागील वर्षाप्रमाणे कोरोनाचे सर्व नियमांचे पालन करून गणपती विसर्जन करावे असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील प्रभाग 'ड' मधील बल्लाळेश्वर गणेश विसर्जन घाट , प्रभाग क्रमांक १९ कोळीवाडा पक्की गणेश विसर्जन घाट, तक्का गणपती विसर्जन घाट या गणेश विसर्जन घाटाची साफसफाई करण्यात आली आहे.

तसेच प्रभाग 'क' कामोठे मधील सेक्टर १४ मधील शंकर मंदिर विसर्जन घाट, जुई गाव विसर्जन घाट, सेक्टर ३४ कृत्रिम तलाव विसर्जन घाट, सेक्टर ६ मधील जुही रेसिडेन्सी विसर्जन घाट येथील स्वच्छतेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

प्रभाग समिती 'ब' अंतर्गत कळंबोलीमधील येथील से.१२, टेम्भोडे, वळवली, खिडुकपाडा गाव, वालदेश्वर मंदिर, प्रभाग क्रमांक १० मधील कलंबोली गाव स्मशानभूमी जवळ, शंकर मंदीर लगत,

.../२



# प्रकल्पग्रस्तांची घरे लवकरच होणार नियमित

## महाविकास आघाडीच्या नेत्यांची नगरविकास मंत्री एकनाथ शिंदेंसोबत बैठक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सह्याद्री अतिथीगृहात नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे तसेच पालक मंत्री कु आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडीच्या पनवेल उरण स्व. दि.बा.पाटील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेवून चर्चा केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांसह महाविकास आघाडीचे सर्व नेते उपस्थित राहिले होते. या बैठकीत प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे कायम करण्याबाबत दस्तुरखुद्द नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे हे सकारात्मक निर्णय घेत असल्यामुळे स्व. दि.बा.पाटील यांचे स्वप्न महाविकास आघाडी सरकार पूर्ण करून प्रकल्पग्रस्त बांधवांना न्याय मिळवून देणार आहे.

आज पार पडलेल्या या बैठकीसाठी खासदार श्रीरंग बारणे, आमदार बाळाराम पाटील, पनवेल उरण महाविकास आघाडी समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल जिल्हाध्यक्ष आर सी घरत, जिल्हाप्रमुख शिवसेना शिरीष घरत, सचिव प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस प्रशांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, माजी आदर्श नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, प्रीतम म्हात्रे विरोधी पक्षनेते पनवेल, सुदाम पाटील जिल्हा कार्याध्यक्ष, अनिल नाईक जिल्हाध्यक्ष समाजवादी पक्ष, गणेश कडू जिल्हा चिटणीस शेकाप, लीना गरड नगरसेविका, कॅप्टन कलावत उपाध्यक्ष महाराष्ट्र काँग्रेस यांच्या समवेत श्री फाटक सचिव नगरविकास, भूषण गगराणी सचिव नगरविकास, सिडको व्यवस्थापकीय संचालक श्री. मुखर्जी, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. शिंदे, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख तसेच अनेक प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते

गरजेपोटी बांधलेली सर्व बांधकामे नियमित करण्यासाठी आज उच्चस्तरीय बैठक पार पडली. प्रामुख्याने येणाऱ्या काळामध्ये प्रकल्पग्रस्तांनी बांधलेली बांधकामे कायमस्वरूपी नियमित करण्यासाठी तोडगा काढण्यासाठी दोन्ही जिल्हाधिकारी यांना निर्देश देऊन सर्व बांधकामे नियमित करण्याच्या दृष्टीने सर्व्हे लवकरात लवकर करून प्रकल्पग्रस्तांनी केलेली जी बांधकामे आहेत ती हद्द निश्चित करून सरकार लवकरच ती सर्व बांधकामे अधिकृत करून तेथील भूमिपुत्रांना न्याय देण्याच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलणार असल्याचे मत यावेळी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

सर्व्हे करण्यासाठी येणाऱ्या अधिकारी यांना सहकार्य करून लवकरात लवकर सर्व्हे करून घेण्यात यावे आणि आपला प्रलंबित प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा तसेच सर्व्हे झाल्यानंतर सुद्धा सिडको कोणतीही तोडक कारवाई करणार नाही असे अभिवचन एकनाथ शिंदे यांनी उपस्थित शिष्टमंडळास दिले. त्याचप्रमाणे मालमत्ता कर बाबतीत चालू वर्ष पासून कर लावावा व करात आणखी सूट द्यावी

.../२

# खारघर वसाहत परिसरातील शेकडो तरूणांनी केला शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख-रायगड पनवेल शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली व खारघर शहरप्रमुख शंकरशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने खारघर येथील शेकडो तरूणांनी भगवा ध्वज हाती घेत व शिवबंधन बांधून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत, पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, खारघर शहरप्रमुख शंकरशेठ ठाकूर, उपशहर प्रमुख मंगेश रानावडे, विभाग प्रमुख इम्तियाज शेख, संजय सावंत, मनेश पाटील, युवासेनेचे प्रेम ठाकूर आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सेक्टर-२० श्रमिक सोसायटीतील अतुल काळे, अमोल काळे, प्रथमेश कनमुटकर, सुशांत पवार, भावेश धावट, रमेश धनावडे, गणेश एकड, विजय जाधव, महेश चवळके, नरेश हरिदास,

.../२

# महा आवास अभिमान अंतर्गत म्हसळा पंचायत समितीला सर्वोत्कृष्ट तालुका पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाचे राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण विभाग गृहनिर्माण महाआवास अभियान अंतर्गत सन २०२०-२०२१ वर्षासाठी राबविण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण विभाग स्तरीय घेण्यात आलेल्या उपक्रम स्पर्धेत रायगड जिल्हा परिषदेच्या म्हसळा तालुका पंचायत समितीचा सर्वोत्कृष्ट तालुका पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सन २०२०/२१ मध्ये झालेल्या निवड स्पर्धेत राज्य शासनाने म्हसळा पंचायत समितीचे

महा आवास अभिमान-ग्रामीण अंतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून 'सर्वोत्कृष्ट तालुका' या प्रकारात प्रथम पुरस्कारासाठी निवड केली. कोकण विभाग, कोकण भवन येथे संपन्न झालेल्या सत्कार सोहळ्यात म्हसळा पंचायत समितीच्या सभापती छायाताई म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले, गटविकास अधिकारी वाय.एम.प्रभे यांचा कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील (भा.प्र.से.) यांच्या

.../२



# अर्थउभारीचा सांगावा

करोनाने झडप घातल्यापासून आशा-निराशेच्या झोक्यावर सारे जग आंदोळते आहे. करोनाचे एखादे पाऊल थोपवले गेले की, साऱ्या जगात वेगाने हालचाली चालू होतात आणि करोनाच्या फटक्याची तीव्रता वाढली की सगळ्या हालचाली चिडीचूप होऊन जातात. हा खेळ आणखी किती काळ चालणार आहे, हे कळायला मार्ग नाही. मात्र, करोना असला तरी आता थांबून, हात बांधून चालणार नाही, याची खूणगाठ सगळ्यांनी कुठेतरी मारली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील आर्थिक वृद्धीचे जे आकडे प्रकाशित झाले आहेत, ते तरी निदान हेच सांगतात. या पहिल्या तिमाहीत भारताच्या जीडीपी म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पादनाने तब्बल २०.१ टक्के इतकी विक्रमी झेप घेतली आहे. करोनोत्तर काळातला हा जागतिक विक्रम असल्याचे सांगितले जाते. तसे असेल तर भारतीय शेतकरी, कर्मचारी, उद्योजक आणि सेवाक्षेत्र या साऱ्यांचे करावे तितके कौतुक थोडे आहे. भारतात हजारो माणसे करोनाने गेली आहेत. लाखो आजारी आहेत. लसीकरण पुरे झालेले नाही. अशावेळी शेती, सेवा आणि उत्पादन या साऱ्याच क्षेत्रांनी उत्तम कामगिरी बजावलेली आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत अर्थव्यवस्थेचा उणे २४ टक्के इतका संकोच झाला होता. त्यानंतर इंग्रजी 'व्ही' आकाराची उसळी अर्थव्यवस्था घेईल, असे अंदाज जागतिक अर्थसंस्थांनी व्यक्त केले. दुसऱ्या लाटेच्या तडाख्यानंतर तेही अंदाज त्यांना बदलून कमी करावे लागले. मात्र, आता भारतीय रिझर्व्ह बँकेचा अंदाज आणि प्रत्यक्ष अर्थवाढीचा वेग यांच्यात फारसा फरक नाही. करोना उरलेल्या आर्थिक वर्षात किती अवतार दाखविणार आहे, याचा अंदाज कुणालाच नाही. मात्र, लसीकरणाचा वेग असाच राहिला तर चालू आर्थिक वर्षासाठीचे सरासरी अर्थवाढीचे साडेनऊ टक्के हे लक्ष्य गाठता येईल, असे दिसते. पहिल्या तिमाहीतील ही आकडेवारी दिलासा देणारी असली तरी ती त्या अर्थाने खरी नाही, याचेही भान ठेवायला हवे. आपण उणे विकासाच्या खोल खाईत गेलो होतो. तिथून परत येताना उणे विकासातून शून्यापर्यंत येऊन मग आपण हळूहळू पुढे चाललो आहोत. उणे विकासातून बाहेर पडून जानेवारी ते मार्च या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेने केवळ १.६ टक्के इतकाच वृद्धिदर नोंदवला होता, याची आठवण ठेवायला हवी. उद्या चालू आर्थिक वर्षातील एखाद्या तिमाहीवर करोनाच्या तिसऱ्या लाटेचे सावट आले तर हेच चित्र पुन्हा उलटेपालटे होण्याची भीती आहे, हेही विसरून चालणार नाही. भारतातील शेतकरी आणि कारखानदार करोनाच्या संकटाने दबून किंवा बिथरून गेलेले नाहीत, हे मात्र या आकडेवारीवरून स्पष्ट होते. तसेच, बाजारातील मागणीही हळूहळू जोर पकडते आहे. वाहनांच्या आणि विशेषकरून ट्रॅक्टरविक्रीच्या विक्रमी आकड्यांवरून मागणी सावरत असल्याचा अंदाज चूक नाही, हे लक्षात येते. केंद्र सरकारने करोना सुरू झाल्यापासूनच अर्थव्यवस्थेत प्रचंड पैसा ओतला आहे. त्याचेही चांगले परिणाम आता दिसत आहेत. याच बरोबर जागतिक वित्तसंस्था भारतीय भांडवली बाजारात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करीत आहेत. मुंबई शेअर बाजाराचा विक्रमी निर्देशांकही तेच सांगतो आहे. असे असले तरी अर्थकारणाच्या व्यापक चित्रामध्ये विक्रमी बेरोजगारी, हातावर पोट असणाऱ्यांचे घटते उत्पन्न आणि संघटित क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात झालेली कामगार व कर्मचारी कपात हेही घटक आहेत. ऑगस्टमधील बेरोजगारीचा दर ८.३२ टक्के इतका नोंदवला गेला आहे. हाच दर आधीच्या म्हणजे जुलै महिन्यात ६.९५ टक्के होता. बेरोजगारीची ही टक्केवारी वाढत्या वृद्धिदराशी मेळ खाणारी नाही. त्यातही, जर उद्योग किंवा सेवाक्षेत्राला उभारी येत असेल तर शहरी बेरोजगारीचा दर दहा टक्क्यांच्या घरात जाणे, हे अधिकच काळजीत टाकणारे आहे. करोनातून बाहेर पडताना जर रोजगार न वाढताच अर्थव्यवस्थेचा आकार वाढत असेल, तर ते चित्र सुखद नाही. गेल्या काही महिन्यांमध्ये शेती तसेच बांधकाम क्षेत्रच वाढीव रोजगार देते आहे. हे लक्षात घेऊन केंद्र तसेच सर्व राज्य सरकारांनी बांधकाम उद्योगाच्या अडचणी तातडीने दूर करायला हव्यात. तेच कृषी क्षेत्राबाबतही म्हणता येईल. २०२०-२१ या आर्थिक वर्षात शेतकऱ्यांनी एकूण धान्योत्पादन ३०८ दशलक्ष मेट्रिक टनांवर नेऊन ठेवले आहे. आधीच्या वर्षापेक्षा ही वाढ तब्बल ३.७ टक्के आहे. करोना असताना अशी कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना भाव तर द्यायला हवाच पण त्याला वेगाने प्रक्रिया उद्योगात सामावून घ्यायला हवे. तरच रोजगार वाढतील आणि त्याचे उत्पन्नही वाढेल. शेतकऱ्यांच्या या कर्तबगारीमुळेच केंद्र सरकार करोना काळात मोफत धान्य योजना राबवू शकले, हे विसरता येत नाही. तेव्हा विक्रमी वृद्धिदराचे खरे स्वरूप ओळखून केंद्र सरकारने आता रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करावे. तेच आवश्यक आणि दीर्घकालीन हिताचे आहे.

# जिल्हयातील १९ बालकांना जिल्हा कृती दलामार्फत आर्थिक मदतीचे प्रस्ताव मंजूर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

देशात पसरलेल्या कोविड-१९ या रोगाच्या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये बालकांची काळजी व संरक्षणाच्या संबंधित या रोगामुळे दोन्ही पालकांचे निधन झाल्याने अनाथ झालेल्या मुलांची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. कोणीही पालक नसल्याने ही बालके शोषणास बळी पडण्याची तसेच बालकामगार किंवा मुलांची तस्करी सारख्या गुन्हयामध्ये ओढली जाण्याची शक्यता असल्याने, अशा मुलांकरिता महिला व बाल विकास विभागाच्या दि. ०७ मे २०२१ च्या शासन निर्णयानुसार कृतीदलाची बैठक आज (दि.०२ सप्टेंबर) रोजी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संदिप स्वामी, जिल्हा परिविक्षा अधिकारी श्री. अशोक भि. पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अनिल फुटाणे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कोल्हे, श्री.एन. जी.मंडलिक, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुजाता सपकाळ, एस.ओ.एस.बालग्राम, सोगाव चे संचालक श्री. राकेश सिन्हा, रायगड चाईल्ड लाईन चे समन्वयक अमोल जाधव, बाल कल्याण समिती सदस्य श्रीमती रोशनी ठाकूर यांची उपस्थिती होती.

या बैठकीत जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील यांनी जिल्हा कृतीदलाचा कामकाज आढावा सादर केला. त्यांनी कोविड-१९ मुळे एक पालक गमावलेल्या बालकांची संख्या-४९९, दोन पालक गमावलेल्या बालकांची संख्या-१९, एकूण एक किंवा दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची संख्या-५१८, एकूण ड्खठ झालेली संख्या-३२१, ड्खठ अपलोड केलेली संख्या-३२१, बाल कल्याण समिती समोर किती बालकांना देण्यात आले-१७३, बाल संगोपन योजनेचे आदेश किती बालकांना देण्यात आले-७६, किती बालकांचे ताब्यात आदेश देण्यात आले-१७०, किती बालकांचे अनुरक्षण सेवेचे आदेश देण्यात आले-०,शाळेच्या फीचे साक्षांकित प्रमाणपत्र व शाळेच्या बँक खात्याच्या माहितीसह आयुक्तालयास सादर करण्यात आले-७३, किती बालकांचे बँक खाते उघडण्यात आले (५ लक्ष रुपयांच्या मुदत ठेवीकरिता)-१९, अनाथ प्रमाणपत्रासाठी किती बालकांचे प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले आहेत-१३, किती कोविड विधवा महिलांची माहिती घेण्यात आलेली आहे-२२६, किती कोविड विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला- या महिलांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले आहेत. जिल्ह्यातील एकूण बालगृहाची संख्या-७, एकूण एक व दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची संख्या छउझउठ संकेतस्थळावर अद्ययावत केल्याची संख्या-४४२, अशी माहिती उपस्थित समिती सदस्यांना दिली.

बैठकीचे अध्यक्ष उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील यांनी कोविडमुळे एक किंवा दोन्ही पालक निधन पावलेल्या बालकांची शोध मोहिम व त्यांना मदत देण्याचे काम युध्दपातळीवर सुरु ठेवावे, एक किंवा दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना शासन निर्णयानुसार देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी, अशा सूचना जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. बालकांची मालमत्ता व आर्थिक हित अबाधित राहण्यासाठी जिल्हा विधी प्राधिकरणाचे सचिव श्री.स्वामी यांनी विशेष मार्गदर्शन व मदत केल्याबद्दल जिल्हा कृती दलाच्या वतीने जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील यांनी त्यांचे विशेष आभार मानले.


**शेअर सर्टिफिकेट गहाळ**

विजय सदाशिव भिसे, राहणार दिव्या किरण हौ. सोसायटी, रुम नं. २, प्लॉट नं. १६२, १६३, रोड नं. ९, सेक्टर ४, नवीन पनवेल या ठिकाणी राहत असून सदर फ्लॅट त्यांच्या स्वतःच्या नावे आहे. त्यांचे दिव्याकिरण सोसायटीने दिलेले शेअर सर्टिफिकेट क्र. १८ ज्यामधील Distinctive nos. 86 ते 90 असा असून वरील शेअर सर्टिफिकेट गहाळ झाले आहे. शेअर सर्टिफिकेट गहाळ झाल्याबाबत तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. जर कोणाला सापडल्यास वरील पत्त्यावर अथवा मो. नं. ८७७९८४४३२५ वर संपर्क साधावा.

सही/-
**विजय सदाशिव भिसे**
दिव्या किरण हौ. सोसायटी, रुम नं. २,
प्लॉट नं. १६२, १६३, रोड नं. ९, सेक्टर ४, नवीन पनवेल


# पालकमंत्री कु.आदिती तटकरे रायगड जिल्हा दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-

शनिवार दि.०४ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ९.०० वा. सुतारवाडी येथून शासकीय वाहनाने दासगाव, ता. महाडकडे प्रयाण. सकाळी १०.३० वा. दासगाव, ता. महाड येथे आगमन व रोशनी ग्रुप आयोजित पूरग्रस्तांना साहित्य वाटप कार्यक्रमास उपस्थिती.स्थळ: प्राथमिक आरोग्य केंद्र, दासगाव, ता.महाड. सकाळी १०.४५ वा. दासगांव येथे अंजुमन ईमा-दादूल मुस्लिम समाज दाभोळमार्फत पूरग्रस्तांकरिता बांधण्यात येणाऱ्या घराचे भूमीपूजन.

सकाळी ११.०० वा.दासगाव येथून शासकीय वाहनाने महाडकडे प्रयाण. ११.१५ वा.महाड येथे आगमन व अंजुमन ईमा-दादुल मुस्लिम समाज दाभोळमार्फत महाड पूरग्रस्तांसाठी साहित्य वाटप कार्यक्रम. स्थळ: पी.जी. सिटी हॉटेल, महाड. दुपारी १२.०० वा.महाड येथून कापडे खुर्द, ता. पोलादपूरकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. कापडे खुर्द, ता.पोलादपूर येथील सामाजिक सभागृहाचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १.०० वा. निवेगाव, ता. पोलादपूर सभामंडप कार्यक्रमास उपस्थिती.

दुपारी १.३० वा.पोलादपूर येथे रोशनी ग्रुप आयोजित पूरग्रस्तांना साहित्य वाटप कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ: तालुका वाचनालय, पोलादपूर. दुपारी १.४५ ते २.१५वा. पोलादपूर येथे राखीव. दुपारी २.१५ वा.पोलादपूर येथून महाडकडे प्रयाण. दुपारी २.४५ वा.महाड येथे आगमन व मेडिकल केमिस्ट असोसिएशनमार्फत पूरग्रस्तांना मदत वाटप. स्थळ: पी.जी. सिटी हॉटेल, महाड. दुपारी ३.४५ वा.महाड येथून शासकीय वाहनाने रोहाकडे प्रयाण. सायं ५.०० वा रोहा येथे आगमन व कै. द.ग. तटकरे ब्लड बँक, बहुउद्देशीय इमारत व अष्टमी मुख्य प्रवेशद्वार कै.शंकर(नाना) बाबूराव पोटफोडे स्वागत कमान भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती. कार्यक्रमानंतर सोईनुसार शासकीय वाहनाने सुतारवाडीकडे प्रयाण.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलाची स्वकष्टार्जित खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**गाव : कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**फ्लॅट नं.३०१, प्लॉट नं.४४, सेक्टर १० ई, कळंबोली, साईपुजा को.ऑ.हौ.सोसायटी, कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड**

वर वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी दि.२२/०७/२०११ रोजी दस्त क्र.पवल-१/०९७००/२०११ ने तत्कालीन विकासक गुरुसाईचरण बिल्डर्स तर्फे श्री.राम सुरेश भगवंत वगैरे ५ यांच्याकडून रजिस्टर्ड खरेदीने घेतलेली आहे. सदरचे फ्लॅट घेतल्यानंतर फ्लॅट धारकांनी सदर इमारतीचे सहकारी संस्था नामे साईपुजा सहकारी संस्था, भूखंड क्रं.४४, सेक्टर १० ई, कळंबोली, नवी मुंबई स्थापन केली असून तिचा रजिस्ट्रेशन नं.एच.बी. ओ.एम./सिडको/एच.एस.जी./(टी.सी.)/४८४०/जे.टी.आर./सन २०१२-२०१३ दिनांक १५/०१/२०१३ रोजी नोंदणी झालेली आहे. सदर सहकारी सोसायटीने आमचे अशिल श्री.चंद्रशेखर रामा जळे यांच्या नावे शेअर्स सर्टीफिकेट प्रत्येकी ५०/- मुल्याची ५ शेअर्स सर्टीफिकेट दिले होते. सदरचे शेअर्स सर्टीफिकेट आमच्या अशिलांकडून गहाळ झालेले आहे. म्हणून सदर शेअर्स सर्टीफिकेट इतर कोणाला मिळाले असल्यास ते वर दिलेल्या मिळकतीच्या पत्यावर अथवा खाली दिलेल्या पत्यावर आणून द्यावे. म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

यदाकदाचित सदर मिळकतीची शेअर्स सर्टीफिकेट मिळून न आल्यास दुय्यम प्रत मिळणेसाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून घेतील याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे सदरची जाहीर नोटीस दिली आहे असे.

दि.०१/०९/२०२१

**सही/-**
**श्री.अरविंद चामले**
**ॲडव्होकेट व नोटरी, भारत सरकार**
**ऑफिस : ११, स्नेह सदन, गडकरी पथ, पनवेल, जि.रायगड**
**फोन नं.२७४५६१७८**
**(मो.) ९८६९५५१७८५**

## जाहीर नोटीस

अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, म्हसळा यांचे कोर्टात

दावा क्र.००४/२०२१
ने.ता.१६/०९/२०२१

श्रीम.पार्वती लक्ष्मण घुलघुले (मयत)
१) श्री.संतोष लक्ष्मण घुलघुले
२) श्रीम.रंजना चंद्रकांत गिजे
३) श्री.नितेश शांताराम पाडावे
४) श्रीम.शैला नितेश पाडावे
५) श्रीम.सुनिता शांताराम पाडावे
रा.चिरगाव, ता.म्हसळा, जि.रायगड — अर्जदार (कुळ)

विरुद्ध

श्री.खु.अली जनाब नामदार नबाव सो.
रा.चिरगाव, ता.म्हसळा, जि.रायगड — सामनेवाला (जमीनमालक)

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसूचिमध्ये नमूद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. त्याकामी सामनेवाला (जमीनमालक) यांना नोटीसची बजावणी दिलेल्या पत्यावर झालेली नाही. सामनेवाला (जमीनमालक) सध्या कोठे राहतात, याची माहिती नाही.

तरी वरील सामनेवाला (जमीनमालक) आणि अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतींमध्ये ज्यांचा हितसंबंध असेल त्यांनी अगर त्यांचे हक्क सांगणारे त्यांचे वालीवारस यांना स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत दि.१६/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगाव, जि.रायगड येथे न्यायाधिकरणापुढे हजर राहून त्यांची बाजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून, नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील. तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसूचि**

| गाव | भूमापन क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चिरगाव | ९/१/७ | ०-१५-७१ | ३.४४ |

ठिकाण : म्हसळा
दिनांक : २४/०८/२०२१

**सही/-**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, म्हसळा**

राव साहेब
वकील : सौ.प्रतिभा पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज नं.१११५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

१) श्रीमती.निशा जयेंद्र केदारी
वय : ५१, व्यवसाय : घरकाम
२) कु.साहिल जयेंद्र केदारी
वय : २१, विद्यार्थी
पत्ता : दोघे रा.सहकार सिनेमा जवळ,
बिल्डींग नं.१६/५५१, ए विंग, टिळक वैभव सी,
एच.एस., टिळक नगर, चेंबुर, मुंबई-४०००८९ — अर्जदार

वरील अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील मयत जयेंद्र शांताराम केदारी यांचे दि.२८/०९/२०२० रोजी ७०७, क्रिष्णा पॅराडाईज, उलवे, नवी मुंबई येथे निधन झाले असून, सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**फ्लॅट नं.७०७, सातवा मजला, क्रिष्णा पॅराडाईज, प्लॉट नं.३२४, सेक्टर १७, उलवे, नवीमुंबई-४१०२०६, मिळकतीचे (५० टक्के) मालक**

वरील मिळकतीबाबत अर्जदारांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दिलेला आहे. व सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य ती हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारस दाखला देईल व त्यानंतर हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.माहे ३/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मा.न्या.मुजावर साहेब ह्यांचे न्यायालयात
वारसांचे सर्टीफिकेटबद्दल जाहीर नोटीस — दिवाणी अं.१५० रा.
प्रोसेस जमा रु.५०/- — Civ.A 150 m
ॲड.केशवन रविंद्रन
अर्जदार यांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.१०९७/२०२१
नि.नं.८
ने.ता.२७/१०/२०२१

श्री.नटराजन वैद्यनाथन
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट क्रं.४०३, ४ था मजला,
सी विंग, भूमी ज्योत सी.एच.एस., सेक्टर १८,
कामोठे, नवी मुंबई ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

श्री.विदयानाथन नटराजन
वय : १९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.फ्लॅट क्रं.४०३, ४ था मजला, सी विंग,
भूमी ज्योत, सी.एच.एस., सेक्टर १८,
कामोठे, नवी मुंबई ४१०२०६ — सामनेवाला

वरील अर्जदार यांची पत्नी व सामनेवाले यांची आई कै.लक्ष्मी नटराजन यांचे दि.१२/०९/२०१८ रोजी पनवेल येथे निधन झाले. मयत कै.लक्ष्मी नटराजन यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**रा.फ्लॅट क्रं.४०३, ४ था मजला, सी विंग, भूमी ज्योत सी.एच.एस., सेक्टर १८, कामोठे, नवी मुंबई ४१०२०६**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३/०९/२०२१ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मा.श्री.मुजावर साहेब यांचे कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
ॲड.विशाल अनंत मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.११४५/२०२१
नि.नं.८
ने.ता.१३/१०/२०२१

१) श्रीमती.रंजना परशुराम म्हात्रे
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.भुषण परशुराम म्हात्रे
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.रोशन परशुराम म्हात्रे
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
१ ते ३ सर्व रा.रुम नं.३०२, मानसी दर्शन अपार्टमेंट,
प्लॉट नं.८, सेक्टर १८, कामोठे, ता.पनवेल
४) सौ.प्रिती शैलेश म्हात्रे
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सदनिका क्रं.२०१, सी विंग, लक्ष्मी सिल्व्हर पार्क,
एच नं.३, एस.नं.४, हवेली, कोढवे, धावडे पुणे-४११०२३ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्रं.१ हिचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील परशुराम घनश्याम म्हात्रे हे दि.११/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर परशुराम घनश्याम म्हात्रे यांनी त्यांच्या हयातीत अर्जदार क्रं.१ सोबत मौजे : कामोठे, ता.पनवेल येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली सदनिका दि.०३/११/२०१४ रोजी दस्त क्रं.पवल-४/१११४२/२०१४ या नोंदणीकृत दस्ताने खरेदी केलेली होती. सदर सदनिकेचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर १८ मधील भूखंड क्रं.१ व २ वरील, मानसरोवर कॉम्प्लेक्स, फेज-३ मधील 'अहिंसा सहकारी सी.एच.एस.लि.' मधील चौथा मजला, विंग-ए, सदनिका क्रं.४०८, क्षेत्र २७.२९ चौ.मी. (बिल्टअप) क्षेत्रफळ असलेली सदनिका.**

सदर सदनिका अर्जदार यांच्या नावे होण्याकरिता त्यांनी ते परशुराम घनश्याम म्हात्रे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाची हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३ माहे सप्टेंबर सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरण परिसरात शासकीय अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताने अवैध बांधकामांना ऊत

ताटाखालचे मांजर बनलेले असल्याने फक्त बेकायदेशीर बांधकामांना नोटीस बजावण्याचेच काम करीत आहे. शासकीय यंत्रणेच्या अशा कागदावरील कारवाईवर परिसरातील नागरिकांकडून जोरदार टिका केली जात आहे.

## गणेशोत्सवाकरिता पनवेल महानगरपालिकेच्यावतीने तयारी सुरू

प्रभाग क्रमांक १६ मधील आदई तलाव येथे गणेश मूर्तींचे विसर्जन होत असते.त्या पार्श्वभूमीवर सदर विसर्जन तलावांची साफ सफाई करणे,तलावाजवळील गवत,कचरा काढणे कामे सुरू केली आहेत.प्रभाग समिती अ, खारघर मध्ये पापडीचा पाडा,मुर्बी गाव, सेक्टर १४ मधील खारघर तलाव ,खुटूकबांधन आदि ठिकाणी स्वच्छतेचे काम सुरू करण्यात आले आहे.

याशिवाय इतरही विसर्जन ठिकाणांच्या स्वच्छतेची कामे सुरु करण्यात आली आहेत. तसेच बांधकाम विभागच्यावतीने विसर्जनाच्या ठिकाणी कृत्रिम तलावांची सोय देखील करण्यात येणार आहे. यासाठी पालिकेच्यावतीने लोखंडी टाक्या, प्लॅस्टिक टाक्या त्या त्या ठिकाणी बसविण्यात येणार आहेत.

## प्रकल्पग्रस्तांची घरे लवकरच होणार नियमित

ही विनंती महाविकास आघाडीने केल्यानंतर त्यावर देखील लवकरच निर्णय घेण्यात येईल असे मंत्री महोदयांनी संगीतले. प्रास्ताविक करत असताना बबनदादा पाटील यांनी सांगितले की दिवंगत दि बा पाटील साहेब यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचे काम महाविकास आघाडी करणार आहे, तरी गरजेपोटी बांधलेली बांधकामे सर्व नियमित करावी जेणेकरून दिवंगत दि बा पाटील साहेबांना हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

## खारघर वसाहत परिसरातील शेकडो तरूणांनी केला शिवसेनेत जाहीर प्रवेश

विशाल कदम, सुरज दळवी, राजेश एकाड, किशोर एकाड, वैभव कौर, विशाल कौर, अक्षय कदम, यांच्या सह अनेक युवकांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सर्व युवकांच्या हातात शिवबंधन बांधून शिवसेना पक्षात स्वागत केले व पुढील भावी वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## म्हसळा पंचायत समितीला सर्वोत्कृष्ट तालुका पुरस्काराने सन्मानित

हस्ते सत्कार करण्यात आला. आयोजित सत्कार कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता पारधी, मुख्याधिकारी डॉ.किरण पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी आदि मान्यवर उपस्थित होते. महा आवास अभियान स्पर्धेत म्हसळा तालुका पंचायत समितीने सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त केल्याने सर्वच स्तरांतून तालुका सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदीप चाचले, पंचायत समितीचे सदस्य मधुकर गायकर, सदस्या उज्वला सावंत, गटविकास अधिकारी वाय.एम.प्रभे, आणि प.स. अधिकारी वर्गाचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

यावेळी बोलताना म्हसळा पंचायत समितीच्या सभापती छायाताई म्हात्रे म्हणाल्या की, म्हसळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांचे सातत्याने मिळत असलेले योगदान, मार्गदर्शन आणि त्यांच्या कृपाशीर्वामुळेच म्हसळा तालुका पंचायत समितीला वरील पुरस्कार प्राप्त होण्यास मदत झाली आहे. पुरस्काराने झालेला सन्मान आमच्यासह तटकरेंच्या सर्वच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा सन्मान आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## घरगुती पर्यावरण पूरक गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशनच्या वतीने 'बाप्पा मोरया घरगुती पर्यावरण पूरक गणपती सजावट स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना २५ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार असून हि स्पर्धा पनवेल शहर अंतर्गत प्रभाग क्रमांक १४, १८, १९ व २० करिता मर्यादित आहे. नाव नोंदणीची अंतिम तारीख ०८ सप्टेंबर असून नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ७७५७०००००० या भ्रमणध्वनी क्रमांक साधावा आणि जास्तीत जास्त नागरिकांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन सभागृहनेते व कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी केले आहे.

## केबल व्यवसायिकाची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केबल व्यवसायिक मोहन पाटील यांना मे महिन्यात सायबर गुन्हेगारांनी त्यांच्या फेसबुकवर लिंक पाठवून वेबसाईटवर गुंतवणुकीवर १० टक्के अधिक परतावा देण्याचे प्रलोभन दाखवले. त्यामुळे त्यांनी सुरुवातीला गुंतवलेल्या रकमेवर अधिकचा परतावा मिळाला. त्यातून त्यांचा विश्वास वाढवून त्यांनी प्रथम ४८ हजार व नंतर ४३ हजार पुन्हा गुंतिविले मात्र परतावा मिळाला नाही व त्यांना आणखी रक्कम भरण्यास सांगण्यात आले. असे मिळून जवळपास २ लाख रूपये उकळण्यात आले. मात्र त्यानंतर संबंधित व्यक्तीशी संपर्क न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पनवेल तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलिसांना साई श्रद्धा सोसायटीच्या पाठीमागील मोकळ्या जागेत गुणे हॉस्पिटल जवळ एका ४० ते ४५ वर्षे इसमाचा मृतदेह सापडला आहे.शहर पोलीस या इसमाच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. त्याची उंची साडेपाच फूट, डोक्याचे केस काळे वाढलेली, दाढी -मिशी वाढलेली आहे. त्याच्या उजव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीमध्ये एस अक्षर व लव चिन्ह गोंदलेले आहे.

# रोह्यात गणेशोत्सवानिमीत्त आरास, पुजा साहित्यांनी बाजारपेठा सजल्या

**दै.रायगड नगरी । रोहा**

यावर्षी कोरोनाच्या निर्बंधात थोड्याबहुत प्रमाणात शिथिलता आल्याने बाप्पांच्या स्वागताची तयारी करण्यासाठी नागरीक मोठ्या उत्साहात असल्याचे दिसत आहे. अश्यातच मुंबईच्या गर्दीत खरेदीला जाण्यापेक्षा रोह्यातील बाजारपेठेत कमी भावात खरेदी करण्यासाठी लोकांची लगबग दिसत आहे. सजावटीसाठी लागणारे आरास साहित्य विक्रीची दुकाने बाजारपेठेत सज्ज झाली असून गणपती साठी आवश्यक असलेल्या सर्व वस्तू उपलब्ध असल्याने नागरीकांचा रोहा बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी होत आहे.



दरवर्षी प्रमाणे गणपती बाप्पाचे आगमण साजरे करण्यासाठी गणेशभक्त मोठ्या उत्साहाने तयारी करतात. गतवर्षी कोरोनाच्या माहामारीत गणपती उत्सव थोडे शांततेत पार पडले. गणपती आहेत कि, नाही हे फक्त त्या घरातील लोकांनाच माहीत झाले. यंदा रोह्यातील कोरोना पॉझिटीव्ह रेट कमी झाल्याने यावर्षी रोहा बाजारपेठा वेळी फुलांनी सजल्या आहेत. थर्माकोलचा वापरावर शासनाने निर्बंध आणल्याने आता जाड पुठ्ठ्याच्या, अक्रेलिक मटेरियल, कापडी सजावट सजावटीकडे नागरीकांचा कल वाढत आहे. यव्यतिरिक्त चायनीज माळा, गोंडयाच्या वर्षानुवर्ष टिकणा-या प्लास्टिक माळा, कंटि, हार, फ्लावर पॉट, शोभेच्या कुंड्या, प्लास्टिकची फुले, कागदी शेळे, जान्हवे, शोभेच्या वस्तू, लाईटचे तोरण अश्या वस्तू बाजारात विकायला आल्याने आता डेकोरेशन करण्यासाठी नागरिकांना व हौशी लोकांना, शाळकरी मुलांना सोपे झाले आहे. महत्वाचे म्हणजे नागरीकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

आता गणपती उत्सव आठ दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे रोह्यात गेल्यावर्षी पेक्षा यावर्षी उत्साह शिगेला पोहोचला आहे. म्हणूनच नागरीकांनी खरेदी करण्याकरीता गर्दी करायला सुरुवात केली आहे.

> गेल्यावर्षी पेक्षा यावर्षी नागरिकांमध्ये उत्साह असल्याने खरेदीसाठी गर्दी सुरु झाली आहे. मुंबईतील बाजारपेठे प्रमाणे रोह्यातही वाजवी दरात गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या वस्तूं साहित्य उपलब्ध केले आहे.
>
> **- नरेश कानेकर, मालक सई गिफ्ट रोहा**

## २५० नागरिकांना कोविड प्रतिबंधक लसीचे मोफत लसिकरण

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

प्रकृती रिसॉर्ट यांच्या वतीने चिकणी, मोरगाव, काशिद, सर्वे आदी गावातील सुमारे २५० नागरिकांना कोविड प्रतिबंधक लसीचे मोफत लसीकरणाचा अभिनव उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आला.



प्रकृती रिसॉर्टचे व्यवस्थापक उमेश शेट्टी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली सदरचा उपक्रम संपन्न करण्यात आला.१५ ऑगस्ट रोजी संपन्न झालेल्या भारतीय स्वातंत्र्याच्या समारंभ प्रसंगी डायरेक्टर प्रभाकर शेट्टी यांनी या विभागातील नागरिकांना रिसॉर्टचे वतीने मोफत लसीकरण करण्यात येईल अशाप्रकारचे अभिवचन उपस्थित नागरिकांना दिले होते.तर त्यांनी नागरिकांना दिलेल्या वचनाची पूर्तता करून सदरचे लसीकरणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. रिसॉर्टचे माध्यमातून एक सामाजिक बांधिलकी व जबाबदारीचे भान राखित आतापर्यंत विविधांगी उपक्रम राबविले जात आहेत.त्याचाच एक भाग म्हणून व नागरिकांना दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यासाठी सदरचे लसीकरण करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे. यावेळी प्रकृती रिसॉर्टचा सर्व स्टाफ व परिसरातील गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान प्रकृती रिसॉर्ट यांच्या या अभिनव उपक्रमाचे समाजातील सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत असून नागरिकांनी धन्यवादही दिले आहेत.

## नितीन शेडगे यांना आंतरराष्ट्रीय फोटोग्राफी स्पर्धेत गोल्ड मेडल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड जंजिरा येथील सुप्रसिध्द छायाचित्रकार नितिन शेडगे यांना दिल्ली येथे झालेल्या फोटोग्राफी स्पर्धेत गोल्ड मेडल मिळाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

दिल्ली येथील जेसीएम फोटोग्राफिक सोसायटीने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय फोटोग्राफी स्पर्धा- २०२१ या स्पर्धेत अमेरिका, ऑस्ट्रेलिया सारख्या विविध देशांतील ३४४ छायाचित्रकारांनी भाग घेतला होता, फोटोग्राफिक सोसायटी ऑफ अमेरिका, इंडियन इंटरनॅशनल फोटोग्राफिक कौन्सिल, फोटोग्राफिक फेडरेशन ऑफ इंडिया व वाईल्डलाइफ फोटोग्राफी असोसिएशन ऑफ इंडिया या नामांकित संस्थेच्या मान्यतेने आयोजित केलेल्या स्पर्धेत मोनोक्रोम फोटोग्राफी, कलर फोटोग्राफी, नेचर फोटोग्राफी व फोटो ट्रॅव्हल हे विषय ठेवण्यात आले होते, सर्व विषयांवर सुमारे ३५०० फोटोंवर ही स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने पार पडली.




सदर स्पर्धेत मुरुडचे छायाचित्रकार नितीन शेडगे यांना फोटो ट्रॅव्हल विषयात 'बेस्ट ऑफ फेस्टिव्हल ' या फोटोला गोल्ड मेडल मिळाले असून इतर विषयात चार फोटोना एक्सेपटन्स मिळाले असून त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# तहसीलदार शरद गोसावी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेली अडीच वर्षे म्हसळा तहसीलदार पदी उत्तम सेवा करणारे तहसीलदार शरद गोसावी हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ रोजी सेवानिवृत्त झाले.



सिंधुदुर्ग जिल्ह्यातून लेखनिक या पदावर रुजू झालेले शरद गोसावी हे आपल्या कल्पकतेतून बढती मिळत मिळत तहसीलदार या पदावर पोचले. ३६ वर्षे आणि १० महिन्याच्या निष्कलंक प्रदीर्घ सेवेनंतर ते सेवानिवृत्त होताना त्यांच्या चेहरा अत्यंत भावुक झालेला दिसत होता. प्रांतधिकारी अमित शेडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या सेवानिवृत्ती कार्यक्रमास श्रीवर्धन तहसीलदार सचिन गोसावी,तळा तहसीलदार अण्णाप्पा कळशेट्टी, निवासी नायब तहसीलदार के. टी. भिंगारे, गटविकास अधिकारी वाय. एम. प्रभे, नायब तहसीलदार डी. जे. पाटील, नायब तहसीलदार श्रीवर्धन गिरी, सभापती छाया म्हात्रे, पं. स. सदस्य मधुकर गायकर,पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे,मंडळ अधिकारी एस. के. शहा, राम कर्चे, बांधकाम अभियंता गणगणे,समिर बनकर तालुक्यातील सर्व तलाठी, महसूल विभाग कर्मचारी, कोतवाल, इतर विभागातील अधिकारी आदि मान्यवर उपस्थित होते. निरोप प्रसंगी आपल्या मनोगतात प्रांतधिकारी अमित शेडगे यांनी सांगितले कि शरद गोसावी हे मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ या गावचे होते. गेल्या अडीच वर्षांपासून ते म्हसळा तहसीलदार पदी कार्यरत असून एक शांत, संयमी आणि कार्यतत्पर अधिकारी म्हणून एक वेगळी छाप होतो.निसर्ग चक्री वादळ, त्योकतो वादळ आणि नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगात कोणत्याही प्रकारची अतिरिक्त कुमक न मागवता यांच्या सहकारी वर्गाच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक अडचणींवर उत्तम प्रकारे मत केली. निवडणूक कामातही त्यांची कामगिरी वाखाणण्या सारखी होती. महत्वाची बाब म्हणजे त्यांच्या हक्काच्या रजा शिल्लक असतानाही केवळ रजेचा लाभ घ्यावा उद्देश त्यांनी कधीही ठेवला नाही. शेवटपर्यंत ते निस्वार्थी पणे सेवा करत राहिले. उर्वरित काळात त्यांना आयुरारोग्य लाभो, त्यांना उदंड आयुष्य लाभो अशी ईशचरणी प्रार्थना प्रांतधिकारी यांनी केली.निरोपमूर्ती शरद गोसावी यांनी अडीच वर्षात मला सहकार्य करून शासनाच्या प्रत्येक योजना यशस्वी केल्या बद्दल सर्व सहकारी, वरिष्ठ, यांना खऱ्या अर्थाने धन्यवाद देऊन ऋण व्यक्त करताना माझ्याहातून चुकून कोणाची मने दुखावली असल्यास दिलगिरी व्यक्त केली.

## सदाशिव साठे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुळसुंदे येथील ज्येष्ठ नागरिक सदाशिव शंकर साठे उर्फ अण्णा यांचे (गुरुवार, दि. ०२ सप्टेंबर) वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी सखुबाई, मुलगा राजेश, संतोष, सतिश, सुना, नातवंडे, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. सदाशिव साठे यांच्या पार्थिवावर गुळसुंदे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिन बाबुराव कांबळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.९१३/२०२१
ने.ता.०६/१०/२०२१

श्री.मयुर जोमा भगत
वय : १८ वर्षे, मु.धामोळे, पो.खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असल्यामुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.मयुर जोमा भगत यांचे वडील स्व.जोमा शिमगू भगत हे दि.१८/०९/२००२ रोजी मयत असल्या कारणाने अर्जदारांचे वडीलांची मृत्यूची नोंद करून मिळणे करिता अर्ज दाखल केला आहे. स्व.जोमा शिमगू भगत रा.धामोळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला असल्याने अर्जदाराने या न्यायालयात स्व.जोमा शिमगू भगत यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहून स्व.जोमा शिमगु भगत ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवावे. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहून न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहून व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.०३/०९/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिन बाबुराव कांबळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.९१०/२०२१
ने.ता.०६/१०/२०२१

श्री.मारुती शिमगु भगत
वय : ५० वर्षे, मु.धामोळे, पो.खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असल्यामुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.मारुती शिमगु भगत यांचे वडील स्व.शिमगु शंकर भगत हे दि.०९/०८/२००२ रोजी मयत असल्या कारणाने अर्जदारांचे वडीलांची मृत्यूची नोंद करून मिळणे करिता अर्ज दाखल केला आहे. स्व.शिमगु शंकर भगत रा.धामोळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला असल्याने अर्जदाराने या न्यायालयात स्व.शिमगु शंकर भगत यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहून स्व.शिमगु शंकर भगत ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवावे. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहून न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहून व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.०३/०९/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

मा.आनंदा मॅडम कोर्ट

अर्जदार यांचे वकील
ॲड.स्वानंद नवाळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.जिल्हा न्यायाधिश सो. यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.६५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०९/१०/२०२१

श्रीमती.सिता दिपक म्हात्रे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.नयना जयदास म्हात्रे, यांचे निधन दि.१७/०४/२०२१ रोजी झाले आहे. सदर कै. नयना जयदास म्हात्रे यांचे मृत्यूसमयी खालील वर्णनाची जंगम मिळकती मयत कै.नयना जयदास म्हात्रे यांचे नावे होती. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतींचे वर्णन

कै.नयना जयदास म्हात्रे, ह्या एन.ए.डी. कंपनीत एल.डी. क्लार्क या पदावर कार्यरत होत्या, त्यांना सदर नोकरीच्या ठिकाणी प्रोव्हीडंट फंड, इन्शुरन्स, ग्रॅज्युटी रक्कम, पेन्शन हे आर्थिक लाभव व सुविधा उपलब्ध होत्या व आहेत. तसेच खालील बँक खात्यांमध्ये काही रक्कमा व लॉकर अस्तित्वात आहेत. त्यांचे वर्णन :-

| अ.क्र. | बँकेचे नाव | खाता क्र. |
|---|---|---|
| १ | स्टेट बँक ऑफ इंडिया, उरण शाखा | ३११८०५५८८१९ |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडिया, उरण शाखा | २०१५२०८२२९८ |
| ३ | सिंडीकेट बँक, जासई शाखा | ५२१३२२०००६९५०० |

कै.नयना जयदास म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात त्यांस केवळ कु.सर्वेश जयदास म्हात्रे हा एकमेव हयात वारस असून तो आजमितीस अज्ञान आहे. कै. नयना जयदास म्हात्रे, हिचे मृत्यूपश्चात त्यांच्या असलेल्या सर्व मालमत्ता या वारसाहक्काने कु.सर्वेश यांचेकडे आलेल्या आहेत. परंतु कु.सर्वेश आजमितीस अज्ञात असल्याकारणाने, सदर मालमत्ता त्यास मिळणेकरिता व तो सज्ञान होईपर्यंत त्यांची देखभाल करणेकरिता सदर अर्जदार यांनी कु.सर्वेश याची आजी या नात्याने अज्ञान पालनकर्ती म्हणून घोषित होवून मिळणेकरिता त्यांनी या मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी, सदर अर्जदार यांस कु.सर्वेश याची अज्ञान पालनकर्ती म्हणून घोषित होवून मिळणेस, कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप पुराव्यानिशी दाखल करावे. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये पुराव्यानिशी हरकती न घेतल्यास, हे मा.न्यायालय अर्जदार यांना ते कु.सर्वेश जयदास म्हात्रे यांची कायदेशीर अज्ञान पालनकर्ती असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक जिल्हा व सत्र न्याया.पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक जिल्हा व सत्र न्याया.पनवेल

श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.जगदीश बी. ठाकूर

### जाहीर नोटीस

दि.चौ.अर्ज क्र.११३२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/१०/२०२१

१) श्री.सतीश अभिमन्यू पाटील
वय : ३० वर्षे, धंदा : शेती
२) श्री.अतिश अभिमन्यू पाटील
वय : २६ वर्षे, धंदा : शेती
३) सौ.रेश्मा विश्वास गायकवाड
पुर्वाश्रमीची रेश्मा अभिमन्यू पाटील
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ३ चे आजोबा कै.आत्माराम पांडु पाटील हे तारीख १४/०२/२००८ रोजी मौजे : ओवळे, ता.पनवेल येथे मयत झालेले असून अर्जदार नं.१ ते ३ यांचे वडील कै.अभिमन्यू आत्माराम पाटील हे तारीख १७/०४/२००७ रोजी मौजे : ओवळे, ता.पनवेल येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ३ यांची आई कै.वनिता अभिमन्यू पाटील ही देखील तारीख २९/०५/२००५ रोजी मौजे : ओवळे, ता.पनवेल येथे मयत झालेली आहे. तसेच कै.आत्माराम पांडु पाटील यांची आई देखील फार वर्षापूर्वीच मयत झालेली आहे. अर्जदार नं.१ ते ३ यांचे आजोबा कै.आत्माराम पांडू पाटील यांचे मालकीची मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती असून तशी ७/१२ सदरी रितसर नोंद आहे. सदर मिळकती महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत केलेली असून सदर मिळकतीत अर्जदार यांचा कायदेशीर वारसाई हिस्सा व हक्क होता व आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : ओवळे व बंबावी, ता.पनवेल, जि.रायगड (यु.के.नं.१३/४ बंबावी)**

| अ.नु. | मौजे | स.नं. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | ओवळे | ४९ | ८ | ०-४२-२ |
| २ | ओवळे | ४९ | ११ | ०-०९-१ |
| ३ | ओवळे | १६६ | १ | ०-१७-४ |
| ४ | ओवळे | ३३ | ७ | ०-२२-५ |
| ५ | ओवळे | १८८ | ३ | ०-०२-३ |
| ६ | बंबावी | ६६ | १ | ०-७०-० |
| ७ | बंबावी | ७० | ० | ०-२८-० |
| ८ | बंबावी | ७२ | ६ | ०-५३-० |

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२७/०८/२०२१ रोजी कोर्टाच्या शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

ये.का.मु.२,००,०००.२००८.पीए ४ जे २७० — दिवाणी अ.१५० रा
शा.नि.न्या.वि.क्र.११७९ दिनांक १.२.१२ — Civ.A 150 m
वारसाचे सर्टीफिकेटबद्दल जाहीरनामा — ॲड.राजेश आर.चौधरी
प्रोसेस जमा रु.५०/- — अर्जदार यांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालय पनवेल येथे
चौ.अर्ज क्र.१०११/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०९/२०२१

१) दिप्ती किशोर मोता
२) गुंजन किशोर मोता
३) विराज किशोर मोता
अर्जदार १ ते ३ रा.लक्ष्मी निवास, प्लॉट नं.१४ ए,
सेक्टर १४, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार क्रमांक १ यांचे पती कै.किशोर शामजी मोता यांचे दि.२५/०९/२०२० रोजी घरी लक्ष्मी निवास, प्लॉट नं.१४ ए, सेक्टर १४, कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८ येथे निधन झाले. कै.किशोर शामजी मोता, यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**
**रॉ हाऊस, प्लॉट नं.१४ ए, सेक्टर १४, कळंबोली, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

(मयत व्यक्ती कै.किशोर शामजी मोता, यांचे फक्त ५० टक्के मालकी हक्क होता.)

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## नगरसेवक विक्रांत पाटील यांनी केले श्रीं च्या घरगुती आरास स्पर्धेचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे मा. उपमहापौर नगरसेवक विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी खास गणेशोत्सवानिमित्त श्रीं च्या घरगुती आरास स्पर्धे चे आयोजन सालाबादप्रमाणे यंदाही केले आहे.

प्रभाग क्र.-१८ मधील नागरिकांसाठी त्यांनी या आरास स्पर्धेचे आयोजन केले असून त्यासाठी प्रथम पारितोषिक ३ हजार रोख, द्वितीय पारितोषिक २ हजार रोख, तृतीय पारितोषिक १ हजार रोख व उत्तेजनार्थ पारितोषिक ५०० रू. रोख असणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी ९१६७०४२६६६ येथे संपर्क साधावा.

## म्हसळा प्राथमिक शिक्षक संघ, शिवाजीराव पाटील गट संघटने तर्फे गुणवंत शिक्षकांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षक वर्गाने म्हसळा तालुक्यातील शिरपेचात मानाचा तुरा रोवुन तालुक्याचे शैक्षणिक क्षेत्रातील नाव उज्वल केले आहे. शिक्षकवृंद नवनवीन उपक्रमात नाविन्यपूर्ण काम करत तालुक्यात गुणवान विद्यार्थी घडवत आहेत.

सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात म्हसळा तालुक्याचा विकासात्मक आलेख वाढवून देण्यासाठी शिक्षक वर्गाचा मोठा वाटा आहे. नुकताच सोनी मराठीवर संपन्न झालेल्याकौन बनेगा करोडपतीया कार्यक्रमात दैदिप्यमान कामगिरी करून म्हसळा तालुक्याचे नावलौकिक केलेले महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ म्हसळा संघटनेचे कणघर केंद्राचे केंद्र प्रतिनिधी पवन आडवळे तसेच संघटनेच्या रिक्त झालेल्या तालुका कोषाध्यक्षपदी अवधूत पवार यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांचा म्हसळा प्राथमिक शिक्षक संघ, शिवाजीराव पाटील गट संघटनेने मान्यवरांच्या उपस्थितीत यथोचित सन्मान करून सत्कार केला. कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष नरेश सावंत,जिल्हा उपाध्यक्ष मोरेसर आदि सहकारी शिक्षक सभासदांनी मनोगत व्यक्त करून गुणवान शिक्षकांच्या कामाचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे सरचिटणीस आण्णासाहेब बिचुकले यांनी केले.


## वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# पनवेल परिसरातील ज्वेलर्स दुकानांची सुरक्षितता धोक्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ज्वेलर्सच्या दुकानात सोने खरेदीच्या बहाण्याने प्रवेश करून काही भामटे दुकानांची पाहणी करतात आणि ज्या ज्वेलर्स दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, सुरक्षारक्षक नाहीत, अशाच ठिकाणी दरोडे टाकले जात आहेत. त्यामुळे ज्वेलर्स दुकानाच्या मालकांनी सीसीटीव्ही कॅमेरा आणि सुरक्षारक्षाकाची नेमणूक करावी अशी मागणी करण्यात येत आहे. एक महिन्यांपूर्वी पनवेल शहरातील झवेरी बाजारात दरोडा पडला मात्र तरीही येथील दुकानदार जागृत नसल्याचे दिसून येत आहे.



सण उत्सव व लग्न सराईत पनवेलमधील ज्वलेर्स दुकानांमध्ये गर्दी असते. या गर्दीचा फायदा घेवून ग्राहकाच्या वेशात आलेले भामटे चोर सोन घेवून पसार होतात. काही वेळा भर दिवसा दुकान लुटण्याची घटना पनवेलमध्ये घडल्या आहेत. एक महिन्यांपूर्वी भरदिवसा एका व्यापाऱ्यावर हल्ला चढवीत सोने लुटले असल्याची घटना पनवेल येथील झवेरी बाजारात घडली आहे. त्याचबरोबर येथील दुकानदार लाखोचा नाही तर कोटयावधी रूपयांचे सोने दुकानात ठेवतात मात्र आपली सुरक्षा कशा प्रकारे करावीत याकडे मात्र दुलर्क्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. सीसी कॅमेरे कुठे आहेत, तर कुठे नाहीत. त्याचबरोबर काही दुकानदारांचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडले आहेत. तर काही कॅमेऱ्याचे रेकॉर्डच बंद आहेत.

यावेळी प्रत्येक दुकानात क्लोज सर्किट कॅमेरे असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर मोठं-मोठ्या दुकानाच्या बाहेर बंदूकधारी सुरक्षा रक्षक असणे गरजेचे आहे. मात्र असे सुरक्षा रक्षक याठिकाणी असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळेच चोरटे आपला मोर्चा ज्वेलर्सच्या दुकानाकडे नेत संधीचा फायदा घेत दरोडा, घरफोडी, चोरी करीत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत ज्वेलर्स दुकानदारांनी सुद्धा सतर्क राहणे गरजेचे आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल बाजारपेठ फुलली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मागच्या २ वर्षाच्या कोरोना काळात सर्वच व्यवसाय ठप्प झाले होते. गणेशोत्सव काय कुठलेही सण साजरा करता आले नाही. मात्र यंदा करोनाच्या नियमांमध्ये शिथिलता मिळाल्याने लोकांची पावलं गणेशोत्सवाच्य खरेदीसाठी बाजाराकडे बोलतान पाहायला मिळत आहे.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाप्पांच्या स्वागतासाठी पूजेचे साहित्य आणि सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठ फुलली आहे. गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या पूजेच्या साहित्य घेण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केलेली पाहायला मिळाली. गोकुळाष्टमी पासून पूजेच्या साहित्यांची खरेदी चांगली सुरू झाली आहे. पूजेच्या वस्तू आणि साहित्यात थोडाफार प्रमाणात भाव वाढ सुद्धा झाली आहे मात्र याचा परिणाम खरेदीवर होणार नाही. तसेच ग्राहकांची संख्या वाढली आहे त्यामुळे यंदा मागच्या वर्षीच्या तुलनेत व्यवसाय चांगला असेल अशी प्रतिक्रिया दुकानदारांनी दिली.



गणेशोत्सव काळात कापूर, कंठी, लाल कपडा रुमाल, अगरबत्ती, धूप, लाकडी पाठ, समई , निरंजन, पितळेचे ताठ, हळद, कुंकू, अबीर, गुलाल, रांगोळी या वस्तूंना मोठी मागणी असते. त्याचप्रमाणे तांबे आणि पितळीच्या वस्तूंनासूद्धा मागणी असते. परंतु मागच्या वर्षी तांब्याचा किलोचा भाव ७०० रुपये किलो इतका होता तो आता ११०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे . तर पितळ मागच्या वर्षी ४५० रुपये किलो इतके होते ते आता ७०० रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

कच्चा माल वाढल्याने ही भाववाढ २० ते २५ टक्के भाव-वाढ झाली असल्याचे दुकानदार सांगतात. तांब्याचे भांडे हे पुणे आणि रोहा या ठिकाणाहून विक्री साठी येते तर पितळ हे मुरादाबाद दिल्ली येथून विक्रीसाठी येते. त्याचप्रमाणे नैवेद्य व प्रसाद वाटपासाठी सणासुदीच्या काळात बदाम, पिस्ता, खडीसाखर, काजू, मनुके यांनासुद्धा मागणी असते. त्याचप्रमाणे हे पदार्थ इतर खाद्यपदार्थांची लज्जत वाढवत असल्याने या साहित्याच्या दरात गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ, तर काहींच्या दरात स्थिरता दिसून आली. प्रमुख साहित्य असलेले बदाम, खारे व साध्या पिस्ताच्या दरामध्ये २०० ते ४०० रुपयांनी वाढ झाली आहे. याचा फटका ग्राहकांना बसणार आहे. एकीकडे कोरोनामुळे नागरिकांच्या आर्थिक संकटांमध्ये वाढ होत आहे आणि दुसरीकडे सणांच्या दिवसात गॅस, डिझेल, पेट्रोल याचे दर सातत्याने वाढत आहे.

त्यात भर पडली आहे ती सुक्या मेव्याची. गणपतीमध्ये विविध गोडाचे पदार्थ केले जातात. त्यामध्ये सुक्या मेव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर असतो. त्यामुळे सण साजरे करायचे तरी कसे असा प्रश्न सर्व सामान्यांकडून विचारला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून बदाम, पिस्ता यांसारख्या सुक्या मेव्याच्या किंमतीत झपाट्याने वाढ झाली आहे. तसेच पूजेच्या वस्तू म्हणून लागणाऱ्या कापूर - १००० रू किलो , २५० रुपये २५० ग्राम, कंठी - ४० रुपया पासून ७०० रुपया पर्यंत, रुमाल - २० रुपया पासून २०० पर्यंत, अगरबत्ती - १०० रुपया पासून १००० पर्यंत, धूप - ४०० रुपये किलो, लाकडी पाठ - १०० रुपया पासून १००० रुपया पर्यंत, समई - ६०० पासून ३० हजार पर्यंत, पितळेचे ताठ - १०० रुपयांपासून ते ५०० , ७०० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत.

> यंदा लोकांमध्ये खरेदीचा उत्साह आहे. नियमांचे पालन करून आम्ही विक्री करतोय. ग्राहकांचा प्रतिसाद पाहता यावर्षी बाप्पाची कृपा दृष्टी आहे.
> **अमोल येवले, श्री कृष्ण पूजा भंडार**

# आवरे गावचा महेंद्र पाटील राज्यस्तरीय पत्रलेखन स्पर्धेत प्रथम

**दै.रायगड नगरी । उरण**

एकेकाळी जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून पत्रव्यवहारातून दैनंदिन व्यवहार चालत होते. मात्र पत्रलेखन संकल्पना सध्या कुठतरी हरवत चालली आहे. घरोघरी सर्वांना सुखदुःखाच्या गोष्टी पोहोचवणारे पोस्टमन काका आजकाल कुठे दिसत नाहीत. पण याच विषयाला पुन्हा एकदा संजीवनी देण्याचे काम वर्डालय मीडिया अँड पब्लिकेशन हाऊसने केले आहे. ११ जुलै २०२१ रोजी ह्या पब्लिकेशन हाऊस तर्फे खुली पत्रलेखन स्पर्धा आयोजित केली होती. ह्या स्पर्धेत वाचकांच्या आवडीचे पत्र ह्या कॅटेगरीमध्ये उरण तालुक्यातील आवरे गावच्या महेंद्र गुरुनाथ पाटील ह्या आगरी समाजाच्या मुलाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.



ह्या पत्रलेखन स्पर्धेत अनेक विषय दिले गेले होते. ह्यात पावसाळा पत्र, महापुरुषाला पत्र, नकार दिलेल्या प्रेयसी,प्रियकराला पत्र, विठ्ठलाला पत्र, वृद्धाश्रमातून आपल्या मुला,मुलीस पत्र असे विषय होते. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत फक्त महाराष्ट्र नाही तर संपूर्ण जगातून ५०० हून अधिक पत्र वर्डालय मीडियाच्या पेटीत जमा झाली. ह्या स्पर्धेतून टॉप ६० अशा स्पर्धकांना निवडण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रातून झालेल्या ह्या पत्रलेखन स्पर्धेत एका आगरी मुलाचे हे यश पाहून संपूर्ण उरण तालुक्यातील नागरिकांनी, साहित्यिक, कवी, लेखक यांनी त्याचे अभिनंदन करत त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. आता प्रथम क्रमांक मिळाल्याने ते आणि त्यांची लेखनशैली,त्यांचे लेख आता चर्चेत आले आहेत.त्यांना प्रथम क्रमांक मिळाल्याने त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# वृद्ध इसमाच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून दोघे जण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मॉर्निंगवॉकसाठी घराबाहेर पडलेल्या एका वृद्ध इसमाच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून मोटारसायकलीवरील दोघेजण पसार झाल्याची घटना कामोठे वसाहतीत घडली आहे.

प्रकाश वाघ (वय-६१) हे मॉर्निंगवॉकला जात असताना भूमी टॉवरसमोर से.-३६ कामोठे येथे अचानकपणे मोटारसायकलीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या एकाने त्यांच्या गळ्यातील ९० हजारांची ३ तोळ्यांची सोन्याची चेन खेचून ते पसार झाले आहेत.



**पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी प्रभाग क्र १९ मधील इंदिरा नाला(लाईन आळी), रोज बाजार विभागाची पाहणी केली. सदर भागातील खराब झालेली भिंत दुरुस्त करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना केल्या. त्याचप्रमाणे नाल्यांची रुंदी व खोली वाढवण्यासाठी सांगितले जेणेकरून पाणी तुंबण्याचे प्रमाण कमी होईल. यावेळी नगरसेविका दर्शना भोईर, शहर अभियंता संजय कटेकर, प्रितम पाटील, राकेश पाटील,महेंद्र भोईर, भाजप पदाधिकारी चंद्रकांत मंजुळे, सपना पाटील उपस्थित होते.**

# शासकीय नियमावलीत गणेशोत्सव साजरा करा : तानाजी नारनवर



**दै.रायगड नगरी । वाकण**

कोरोनाच्या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सलग दुस-यांदा आपण गणेशोत्सव सण साजरा करीत आहोत. कोरोनाचे संकट अद्यापही टळलेले नाही. त्यामुळेच आगामी काळात येणारे गणेशोत्सव, साखरचौथ गणेशोत्सव व नवरात्र उत्सव हे आपले सर्व सण कोरोना विषयी शासनाने लावलेल्या निर्बंधांचे पालन करुन, कायद्याचे पालन करुन, कोणताही भांडणतंटे न करता शांतपणे साजरे करा असे आवाहन रायगड जिल्हा शांतता समितीचे सदस्य व पळस ग्रामपंचायतीच्या तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष शिवरामभाऊ शिंदे यांनी केले. पळस ग्रामपंचायतीच्या कार्यालयात गुरूवारी (दि.२) सकाळी संपन्न झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस नागोठणे पोलिस ठाण्याचे नवनियुक्त पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर, पळस ग्रामपंचायतीच्या सरपंच परिक्षा घासे-चंदने, उपसरपंच चंद्रकांत भालेकर, ग्रा.पं. सदस्य किसन बोरकर, निष्ठा विचारे, पळसचे माजी सरपंच हिराजी शिंदे, महादेव डाकी, पोलिस पाटील बबन शिंदे, मारुती शिर्के, गणपत डाकी, रामचंद्र कदम, संतोष भालेकर, सचिन जोशी, नागोठणे पोलिस ठाण्यातील हे.कॉ. विनोद पाटील, हे.कॉ. दिनेश ढेणे आदींसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गणेशोत्सव साजरा करतांना शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे सर्वांनी पालन करणे गरजेचे आहे. घरगुती गणपतीसाठी दोन फूट व सार्वजनिक गणपतीसाठी चार फूट उंचीच्या गणेश मुर्तींची परवानगी असल्याने त्याचे सर्वांनी पालन करावे.

गणेशोत्सवात गर्दी टाळण्यासाठी आरतीसाठी घरोघरी न जाता आपापल्या घरी आरती करणे, आपल्याकडे येणाऱ्या पाहुण्यांसाठी सॅनिटायझरची व्यवस्था करणे, कोरोना काळात उपयुक्त ठरणारे रक्तदान शिबिर व इतर सामाजिक उपक्रम राबवून पारंपारिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा असेही पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांनी स्पष्ट केले.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email :-mahad.ee@mahapwd.com Ph.No. (02145) 222167

**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ४३ सन २०२१-२०२२**

खालील कामांसाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक (०२१४५) २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना WWW.mahapwd.com या संकेतस्थळावरुन ऑनलाईन फॉर्म फी भरुन, डावुनलोड करुन **दिनांक ०६/०९/२०२१ पासून ते दिनांक १३/०९/२०२१ रोजी दुपारी १४.०० वाजे** पर्यंत खरेदी करावयाचे आहेत. व दिनांक १३/०९/२०२१ रोजी दुपारी १५.०० वाजे पर्यंत कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड यांचे कार्यालयात ऑफलाईन निविदा सादर करावयाच्या आहेत. भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक १३/०९/२०२१** रोजी **१६.००** वाजता कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड यांचे कार्यालयात ऑफलाईन उघडण्यात येतील.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा १ वगळून) | ई-निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | फल्याण वावे जांभुळपाडा येरळ सुतारवाडी जामगांव रस्ता प्र.जि.मा. ३९ कि.मी. ४३/०० मध्ये कुंडलिका नदीवर मोठया पुलाचे पोहेचमार्गासह बांधकाम करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (पुलाचे व रस्त्याचे सविस्तर सर्वे करणे.) | ६४२३९७ | ७,००० | ३ महिने | ५६०/- |
| २ | मामलेदार कचेरी रोहा येथील तीन टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड (एस आर ) | ३०५४७० | ९,००० | ३ महिने | ५६०/- |
| ३ | रोहा येथील तहसिल क्वॉटरची १०४/७ मध्ये विशेष दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (एस आर) | ३१८९६१ | ४,००० | ३ महिने | ५६०/- |
| ४ | मामलेदार कचेरी रोहा येथिल नविन रेकॉर्ड रूमची विशेष दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (एस आर) | ८८८६४५ | ९,००० | ३ महिने | ५६०/- |
| ५ | वाघोसे येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ७९७८६९ | ७,००० | ३ महिने | ५६०/- |
| ६ | रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२०-२१ अंतर्गत पोलादपूर देवपूर गोळेगणी कुडपण रस्ता प्र.जि.मा. ७१ कि.मी. ०/०० ते ५/०० व २३/०० ते २७/०० मध्ये देखभाल व दुरूस्ती (झाडांच्या फांद्या छाटणे, चूना व गेरू लावणे. इ.) करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | २४८२१७ | ३,००० | ३ महिने | ५६०/- |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना कार्यकारी अभिंयता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल.
२) कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामूल्य मिळू शकेल.

जा.क्र. : मवि/लेशा/निविदा/२५५३
दिनांक: ०२/०९/२०२१

**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**